# जेव्हा हिच्या खुणेचा......

जेव्हा हिच्या खुणेचा, मजला मिळे इशारा
बे-बे करीत उठतो, होतो जो माझा बकरा

कधी पार्टीत चुकून मी, थोडीशी जास्त घेतो
थोडी जीभ सैल होता, काहीतरी बहकतो
पाहून हिचे डोळे अन् लालबूंद चेहरा
गुपचुप कॉफी पितो, नवरा जो मी बिचारा
जेव्हा हिच्या खुणेचा.......................

पार्टीत काव्य स्फूरता, चंद्रास मी फुलवतो
श्रोत्यांचे दिल रिझवण्या, सिनेतारकां आळवतो
'माधुरी' येता ओठा, चढतो हिचा जो पारा
गुपचुप काव्य गिळतो, नवरा जो मी बिचारा
जेव्हा हिच्या खुणेचा.......................

'ह्रतीक रोशन' सारखा, दिसतो जो मी थोडासा
माझ्या मागे हो बायका, हा दोष काहो माझा
पाघळता मी जरासा ,उडतो हिचा जो भडका,
चावी घेऊन पळतो, गाडी मी स्टार्ट करण्या
जेव्हा हिच्या खुणेचा.......................

सुहास पै